# प्रेसनोट

## धुलीवंदन विनापरवाना डी.जे.चा वापर –पोलीसांची कारवाई

जा.क्र. १८८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०३/२०१७

विनापरवाना स्पिकर व डी. जे. चा वापर करुन ध्वनीप्रदुषण करणाऱ्यांविरुध्द भंडारा पोलीसांनी धडक कारवाई यापुर्वीच सुरु केली असून दिनांक १३/०३/२०१७ रोजी धुलीवंदना निमीत्त भंडारा शहरातील तनुजा **ज्वेलर्स समोर पांढराबोडी रोड, शुक्रवारी येथे व भांडारकर ट्रेडर्स समोर खातरोड भंडारा येथे** विनापरवाना डी.जे. लावुन **ध्वनीच्या निश्चीत करण्यात आलेल्या कमाल पातळीचे उल्लंघन करुन ध्वनीप्रदुषण** केलेल्या कारणावरुन भंडारा शहर पोलीसांनी डी.जे.मालक अंकित अशोक खराबे रा. राजगोपालचारी वार्ड भंडारा व रोहीत कृष्णाजी लांजेवार रा. शुक्रवारी भंडारा यांचेवर ध्वनीप्रदुषण नियम (नियमन व नियत्रंण)– २००० अन्वये स्वतत्रपणे कारवाई केली असून त्यांचेकडील डी.जे.चे साहीत्य पोलीसांनी जप्त केले आहेत.

श्री. महेश बेडेकर यांनी मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल केलेल्या जनहीत याची क्र. १७३/२०१० नुसार राज्यातील ध्वनीप्रदुषणा विषय तक्रारीची दखल मुंबई उच्चन्यायालयाकडून घेण्यात येत असुन पोलीसांनकडून ध्वनी प्रदुषणासंदर्भात झालेल्या प्रत्येक कारवाईचा अहवाल मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात येत आहे. सर्व धर्मीयांचे सण, उत्सव,तसेच सर्व धर्मीयांचे प्रार्थनास्थळे– मंदीर, मज्जीद, बौध्द विहार ई तसेच कोणत्याही सार्वजनीक ठिकाणी धार्मीक सण उत्सवातील मिरवणूका, लग्नाच्या वराती मध्ये ध्वनीक्षेपक लावण्यापूर्वी पोलीसांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. परवानगी मिळाल्यावर देखील नुसार आवाजाच्या उच्चतम पातळीची मर्यादा पाळणे सर्व संबंधितांना बंधनकारकर आहे. मर्यादेचे उल्लघंन झाल्यास तसेच कारवाईत हयगय झाल्यास पोलीसांवर देखील कारवाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले आहेत.

त्याकरीता अपर पो. अधिक्षक,विभागीय अधीकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, पोलीस उपअधि.(गृह)यांची एक संनियत्रंण समिती निर्माण करण्यात आली आहे.

पो.नी. बि.आर. गाडे
जि.वी.शा
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.